सिंदखेड राजा येथे मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे दुसरे प्रशिक्षणाचे आयोजन >> पान 2

गद्दारांना त्यांची जागा दाखवा, उद्धव ठाकरे विरोधकांवर कडाडले >> पान 3

सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात चार मतदान केंद्राची वाढ; आता ३४० मतदान केंद्र >> पान 4

**सुविचार**

आपल्या स्वप्नांवर विश्वास ठेवा, तीच आपल्याला यशस्वी करते.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



'इंडियन आयडल' फेम प्रसिद्ध मराठी गायकाने मुंबईत खरेदी केलं आलिशान घर आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 91 ■ शनिवार, दि. 09 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# लाडक्या बहिणींना साद, विकासाची गाज आणि मराठीचा नाद; पीएम मोदींचं धुळ्यात जोरदार भाषण

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** केंद्र सरकारने कायम महिलांना केंद्रस्थानी ठेवून अनेक निर्णय घेतले. महायुती सरकारने महाराष्ट्रातील महिलांसाठी सुरु केलेल्या योजनांची मविआने खिल्ली उडवली. मात्र, आज याच योजना प्रमुख आधार झाल्या आहेत. महायुती सरकारने २५ हजार महिला पोलिसांची भरती केली. यामुळे महिलांना सामर्थ्य मिळाले, त्यांना रोजगार मिळाला, त्या सशक्त झाल्या, असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. पंतप्रधान मोदी यांनी शुक्रवारी धुळ्यातील सभेतून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ केला.

या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातील महिला वर्गाला साद घालण्यासोबत महायुतीच्या काळात झालेला विकास आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा मुद्दा अधोरेखित करत एकप्रकारे विधानसभा निवडणुकीचा नरेटिव्ह सेट केला. त्यांनी म्हटले की, आमचं सरकार महिला सशक्तीकरणासाठी जी पावलं उचलत आहे, ती मविआला सहन होत नाहीत. लाडक्या बहीण योजनेची देशभरात चर्चा सुरु आहे. पण कॉँग्रेसी व्यवस्थेतील लोक ही योजना बंद करण्यासाठी कारस्थान रचत आहेत. महाविकास आघाडीला राज्यात सत्ता मिळाली तर कॉँग्रेस ही योजना बंद करेल. त्यासाठी महाराष्ट्रातील महिलांनी सतर्क राहिले पाहिजे, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. मविआला नाराशक्ती सशक्त होताना पाहवत नाही. कॉँग्रेस आणि मविआ आघाडीचे लोक महिलांना कशाप्रकारे शिव्या देतात, अभद्र बोलतात, हे सर्वांनी पाहिले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील महिला मविआला माफ करणार नाहीत, असे मोदींनी म्हटले.



मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, ही राज्यातील जनतेची अनेक दशकांपासूनची इच्छा होती. कॉँग्रेस पक्षाने महाराष्ट्रात राज्य केले, केंद्रात राज्य केले, अनेकदा कॉँग्रेसची दोन्हीकडे सत्ता होती. पण त्यांना मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची गरज कधी वाटली नाही. कॉँग्रेसने मराठी भाषेच्या सन्मानाकडे दुर्लक्ष केले. पण मोदींनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा कसा दिला, याचं कॉँग्रेसवाल्यांना वैषम्य वाटते, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले.

महायुतीच्या काळात महाराष्ट्रात विकासाचे नवे विक्रम रचले गेले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्राला गौरव आणि विकास पुन्हा प्राप्त झाला. महायुतीच्या वचननाम्यातील १० संकल्प हे प्रत्येक वर्गाच्या विकासाची हमी, समानतेची ग्वाही आणि सगळ्यांना सोबत घेऊन चालण्याचा विश्वास देणारा आहे. हा वचननामा विकसित भारताचा आधार आहे. विकसित महाराष्ट्र आणि विकसित भारतासाठी महिलांचं पुढे जाणं, त्या सशक्त होणे गरजेचे आहे. महिला पुढे जातात तेव्हा समाज पूर्ण वेगाने प्रगती करतो, असे मोदींनी म्हटले.

महायुतीच्या काळात महाराष्ट्रात प्रचंड परकीय गुंतवणूक झाली. दोन वर्षे महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीत अव्वल होता. गेल्या तीन महिन्यांत देशात आलेली एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ५० टक्के वाटा हा एकट्या महाराष्ट्राचा आहे. केंद्र सरकार परकीय गुंतवणूक आणि विविध प्रकल्पांसाठी महाराष्ट्राला प्राधान्य देत आहे, असेही मोदींनी सांगितले.

## मुलुंड मध्ये गाडीमध्ये गुदमरुन पाच वर्षीय मुलाचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** मुलुंड मध्ये निष्काळजीपणा मुळे एक पाच वर्षाच्या मुलाचा कार मध्ये गुदमरून मृत्यू झाला आहे. कबीर अर्जुन कनोजिया असे या मृत पावलेल्या पाच वर्षीय मुलाचे नाव आहे. काल दुपारी हा मुलगा जवळील गॅरेज मध्ये खेळत होता. खेळता खेळता त्याने एक उभ्या असलेल्या मोटर कार चा दरवाजा उघडून गाडीत जाऊन बसला. गाडी आतून त्याला उघडता आली नाही आणि गुदमरून त्याचा मृत्यू झाला. गेल्या काही दिवसात बंद गाड्यांमध्ये अडकून लहान मुलांचा मृत्यू. होण्याच्या घटना वारंवार घडत आहे. या घटनेत पोलिसांनी आकस्माक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास नवघर पोलीस करीत आहे. पोलिसांनी पालकांना असा घटना टाळण्यासाठी पालकांनी मुलांची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.



## मोटारीचा 'जॅमर' काढण्यासाठी मागितली लाच; सहायक फौजदारासह, वॉर्डनवर गुन्हा

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** नो पार्किंगमध्ये लावलेल्या मोटारीच्य चाकाला लावलेला जॅमर काढण्यासाठी एक हजारांची लाच मागणाऱ्या वाहतूक शाखेतील वॉर्डनसह हायक फौजदाराविरुद्ध समर्थ पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघेही समर्थ वाहतूक विभागात कार्यरत आहेत.

सहायक पोलीस फौजदार किरण दत्तात्रय रोटे (वय ५१), ट्रॅफिक वॉर्डन अनिस कासम आगा (वय ४८, रा. कोंढवा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत एका मोटरचालकाने फिर्याद दिली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ही कारवाई केली. समर्थ वाहतूक विभागांतर्गत येणाऱ्या एका रस्त्यावरील नो पार्किंगमध्ये तक्रारदाराने त्यांची मोटार लावली होती. त्यामुळे वाहतूक विभागाने त्यांच्या मोटारीला जॅमर लावला. जॅमर काढण्यासाठी समर्थ वाहतूक विभागातील ट्रफिक वॉर्डन (वाहतूक मदतनीस) अनिस आगा याने तक्रारदाराकडे १ हजार रुपयांची लाच मागितली. याबाबत तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार दिली होती.

एसीबीने याची पडताळणी केली. त्यामध्ये वॉर्डन अनिस याने एक हजारांची लाच मागून तडजोडीत सातशे रूपये स्विकारण्याचे मान्य केले. अनिस हा कार्यालयात उपस्थित नसताना तक्रारदार समर्थ वाहतूक विभागाच्या कार्यालयात गेले. त्यावेळी सहायक फौजदार रोटे यांनी अनिसने मागितलेले पैसे माझ्याकडे दे, असे म्हणून लाच घेण्यास संमती दर्शविली. त्यानूसार एसीबीने वॉर्डन अनिस आणि सहायक फौजदार रोटे यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या धाडीत परराज्यातील दारू, ४ वाहनांसह ४० लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक-२०२४ च्या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत परराज्यातील दारू तसेच ४ वाहनांसह ४० लाख ६४ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

राज्य उत्पादन शुल्क, मुंबई विभागाचे आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे, पुणे विभागीय उपआयुक्त सागर धोमकर, अधीक्षक, चरणसिंग राजपूत, उप-अधीक्षक, संतोष जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क डी विभागाकडून २७ ऑक्टोबर २०२४ रोजी घोटावडे गावच्या हद्दीत, आंबटवेट रोडवर दारूबंदी गुन्ह्याकामी सापळा लावून टाटा कंपनीचे एस गोल्ड या प्रकाराचे चारचाकी वाहन क्र. MH 12 TV5122 पकडले. या वाहनामधून गोवा राज्य निर्मित व महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधित असलेली विदेशी दारूचे एकूण १८ बॉक्स (८६६ सिलबंद बाटल्या) तसेच महाराष्ट्र राज्याचे बनावट लेबल असा एकूण ३ लाख ५५ हजार १४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीस अटक करण्यात आली. न्यायालयाने आरोपीस ३ दिवस एक्साईज कोठडी मंजूर केली. पुढील तपासात ४ नोव्हेंबर २०२४ रोजी कोथरूड, कर्वे पुतळ्याजवळ तपासाकामी छापा टाकला असता सदर गुन्ह्यासाठी वापरण्यात येणारे विविध ब्रॅन्डचे विदेशी मद्याचे एकूण १०,००० नग बनावट लेबलसह सापडले आहे. याची एकूण किंमत ८८,१६० रुपये आहे. या गुन्ह्यातील पुढील तपासात दिनांक ६ नोव्हेंबर २०२४ रोजी शनिवार पेठ, येथून बनावट लेबल छपाई करण्यासाठी वापरण्यात आलेल्या मशीनसह एकूण ३० लाख २ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या गुन्ह्यात एकूण ३४ लाख ४५ हजार ५५० रुपयांच्या मुद्देमालासह एकूण ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, डी विभाग सचिन श्रीवास्तव, ई विभागाचे निरीक्षक, शैलेश शिंदे, स.दु.नि. स्वप्नील दरेकर, स.दु.नि.सागर धुर्वे, जवान श्री. गजानन सोळंके, जवान श्री. संजय गोरे, यांनी सदर कारवाई मध्ये सहभाग घेतला असून पुढील तपास निरीक्षक, सचिन श्रीवास्तव करीत आहेत.

या विभागाने १ ऑक्टोबर २०२४ पासून आजपर्यंत एकूण ३१ गुन्हे नोंद करून ३१ आरोपींना अटक करून ४ वाहनांसह एकूण ४० लाख ६४ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये गावठी दारू ९९१ लिटर, कच्चे रसायन १६०० लिटर, ताडी २२७ लिटर, देशी दारू ३३.०० ब. लि., बिअर २५५ ब. लि. व परराज्यातील गोवा निर्मित मद्य एकूण १५५.८८ ब. लि. यांचा समावेश आहे. ही कारवाई विभागाचे दुय्यम निरीक्षक विजय सूर्यवंशी, गणपती थोरात, श्रीमती शीतल देशमुख जवान श्रीमती वृषाली भिटे यांनी केली केली.

# फडणवीसांसोबत वैर नाही पण त्यांना सोडणार नाही, जरांगेंनी कारणही सांगितले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणाच्या मुद्यावर राज्यात रान उठवणारे मनोज जरांगे पाटील हे सध्या राज्यातील दौऱ्यावर आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी महायुती सरकारवर टीका करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सातत्याने टीका केली. मनोज जरांगे पाटील यांच्याकडून फडणवीस यांना टार्गेट केले जात असल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले होते. मात्र, मनोज जरांगे यांनी याचे कारणही सांगितले आहे.



विधानसभा निवडणुकीतून माघारीची घोषणा केल्यानंतर आता मनोज जरांगे पाटील हे आता विविध जिल्ह्यांच्या भेटीवर आहेत. या दरम्यान जरांगे पाटील हे मराठा समाजाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या सभांना संबोधित करत आहेत. एका सभेत बोलताना मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीकेची झोड उठवली.

मनोज जरांगे यांनी आपल्या भाषणात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकेची झोड उठवली. त्यांनी म्हटले की, देवेंद्र फडणवीसांना सोडणार नाही. त्याने समाजाचे खूप वाटोळं केले आहे. फडणवीस हे माझे शत्रू नाही, समाजाचेही शत्रू नाही. त्यांच्यासोबत माझं काही वैयक्तिक वैर असण्याचे कारण नाही. पण, फडणवीस यांनी आई-बहिणींवर हल्ला केला. त्यावेळी महिलांनी केलेला आक्रोश आजही आठवतो. त्यांच्या किंकाळ्या आठवल्या तरी थरकाप उडतो असे जरांगे यांनी म्हटले. उपस्थितांना त्यांनी म्हटले की, महिलांची साधी भांडणे झाले तरी त्यावेळचा आवाज व्यथित करतो. त्यावेळी काय झालं असेल याची कल्पना करून पाहा, असे जरांगे यांनी म्हटले.

मनोज जरांगे हे अंतरवाली सराटीत उपोषणावर असताना पोलिसांनी लाठीचार्ज केला होता. त्याशिवाय, जमावाला पांगवण्यासाठी हवेत गोळीबार केला होता. या लाठीचार्जमध्ये महिलांसह अनेकजण जखमी झाले होते. या लाठीचार्ज तीव्र पडसाद राज्यात उमटले होते.

राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मराठा आरक्षण आंदोलकांचे इतर समाज घटकासोबतचे उमेदवार उभे राहणार असल्याची घोषणा मनोज जरांगे यांनी केली. मात्र, जरांगे यांनी काही मतदारसंघाची घोषणा केली होती. मात्र, एका दिवसानंतर निवडणुकीतून माघार घेत असल्याचे त्यांनी जाहीर केले. जरांगे यांच्या निर्णयाची उलटसुलट चर्चा सुरू झाली होती.

# ईडीकडून ३३३ कोटींच्या मालमत्तेवर टाच

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीतील गुंतवणूक फसवणुकीप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) ३३३ कोटी ८२ लाख रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. टाच आणण्यात आलेल्या मालमत्तेत मेसर्स कुटे सन्स डेअरी लिमिटेडची आणि मेसर्स कुटे सन्स फ्रेश डेअरी प्रायव्हेट लिमिटेडची सातारा व अहमदनगर येथील जमीन, इमारती, प्रकल्प आणि मशीन यांचा समावेश असल्याची माहिती गुरुवारी ईडीकडून देण्यात आली.

ईडीने दिलेल्या माहितीनुसार, ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांत ५२ पेक्षा जास्त शाखा आहेत. त्याचे व्यवस्थापन आणि नियंत्रण सुरेश ज्ञानोबा कुटे, यशवंत व्ही. कुलकर्णी आणि अन्य संबंधित करत होते. विविध ठेव योजना आणून त्यांनी १२ ते १४ टक्क्यांपर्यंत व्याज देण्याचा दावा केला. वैयक्तिक कर्ज, साधे कर्ज, पगार कर्ज, मुदत कर्ज, सुवर्ण कर्ज आणि एफडीआर कर्ज अशा विविध योजना सुरू केल्या. यातील आरोपी सुरेश कुटे आणि संबंधितांनी ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या (डीएमसीएसएल) माध्यमातून गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यासाठी अनेक गुंतवणूक योजना राबविल्या. त्यात चार लाख गुंतवणूकदारांनी गुंतवणूक केली होती. तपासानुसार, या प्रकरणी २,४६७ कोटी ८९ लाख रुपये इतरत्र वळवण्यात आल्याचा आरोप आहे. त्यानंतर, कुटे यांच्या विरोधात फसवणुकीचे नऊ गुन्हे दाखल झाले. याप्रकरणी ईडीने आतापर्यंत १४३३ कोटी ३० लाख रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे.




# संघर्ष नको असेल तर शिवाजी पार्क मैदान आम्हाला द्या; संजय राऊत यांचा धमकीवजा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हेच महाराष्ट्रातून मुंबईला तोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. सध्या राज्यात सर्वात मोठे परप्रांतीय हे नरेंद्र मोदी आणि अमित शाह हेच आहेत. इतके असतानाही मनसे अध्यक्ष राज ठाकरे त्यांना मदत करीत आहेत, असा घणाघात उबाठा गटाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी केलाय. यासोबतच १७ नोव्हेंबरला शिवाजी पार्कच्या मैदानावरून शिवतीर्थावर तणाव निर्माण होण्याची शक्यताही त्यांनी बोलून दाखवलीय.

मुंबईत ते बोलत होते.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सांगता १८ नोव्हेंबरला होत असून, आदल्या दिवशी १७ नोव्हेंबरला शिवाजी पार्क मैदान हे प्रचाराकरिता मिळावे, यासाठी उबाठा गटाने त्याचबरोबर मनसेने मुंबई महानगरपालिकेकडे अर्ज केलाय. १७ नोव्हेंबर रोजी हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतिदिन आहे. या कारणाने हजारो शिवसैनिक बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळावर नमन करण्यासाठी शिवतीर्थावर येत असतात. आता याच मैदानासाठी दोन्ही ठाकरे बंधू आग्रही झाल्याने मोठा पेच निर्माण झालाय. हे मैदान प्रचारासाठी कुणाला द्यायचे याबाबत अद्याप अंतिम निर्णय झाला नसला तरीसुद्धा या मैदानावर प्रचार सभा घेण्यासाठी महापालिकेकडे १५ ते १६ अर्ज प्राप्त झालेत.

मैदान आम्हालाच मिळायला हवं: याबाबत बोलताना संजय राऊत म्हणाले आहेत की, १७ नोव्हेंबर हा बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतिदिन आहे. त्याच दिवशी शिवतीर्थावरील सभेसाठी हे मैदान दुसऱ्याला देण्यात आलंय. त्या पक्षाने एक दिवस अगोदर अर्ज केला म्हणून हे मैदान त्यांना देण्यात आले, अशी माहिती आहे. परंतु त्या दिवशी बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळावर हजारो शिवसैनिकांचा दिवसभर राबता असतो. अशात संध्याकाळी दुसऱ्या पक्षाची इथे सभा झाली तर मोठा तणाव निर्माण होऊ शकतो. इथे आचारसंहिता लागू होऊ शकत नाही. पण तुमच्या आडमुठेपणामुळे इथे संघर्ष होऊ देऊ नका आणि हा संघर्ष जर टाळायचा असेल तर १७ तारखेला शिवाजी पार्क मैदान आम्हालाच मिळायला हवं, अशी रोखठोक भूमिका संजय राऊत यांनी घेतलीय.



## नेपाळची नवी कुरापत

नेपाळ हा भारताचा सख्खा शेजारी देश. जगातील एकमेव हिंदू धर्मीय देश. भारत हा देखील हिंदू संस्कृतीचा पाईक त्यामुळे दोन्ही देशातील चालीरीती, संस्कृती, सण, उत्सव, परंपरा सारखीच त्यामुळे नेपाळ हा भारताचा शेजारी आसला तरी भारताने त्याला कायम छोट्या भावा सारखीच वागणूक दिली आहे. नेपाळवर ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्या वेळी भारतच धावून गेला त्यामुळे गेल्या अनेक शतकांपासून भारत आणि नेपाळचे संबंध मैत्रीपूर्ण आणि सौहार्दाचे राहिले आहेत मात्र या संबंधांना मागील काही वर्षात तडा गेला आहे. भारत नेपाळ संबंधातील सौहार्दात कटुता निर्माण होऊन दोन्ही देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. हा तणाव कमी करून दोन्ही देशात पूर्वी प्रमाणे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारताकडून होत असताना नेपाळ मात्र काही तरी कुरापती काढून दोन्ही देशातील तणाव कायम ठेवत आहे. नेपाळने अशीच एक नवी कुरापत काढून दोन्ही देशातील तणाव पुन्हा वाढवला आहे. नेपाळने १०० रुपयांची नोट पुन्हा डिझाईन करण्याचा निर्णय घेतला आहे. या नोटा छापण्याचे कंत्राट त्यांनी चीनमधील एका कंपनीला दिले. अर्थात तो त्यांचा अधिकार आहे. नोटा बदलण्याचा, त्याची डिझाईन बदलण्याचा, आणि त्याची छपाई कोठून करायची याचा सर्वस्व अधिकार नेपाळचा असल्याने भारताने त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही भारताने यावर आक्षेप घेतला नाही मात्र ज्यावेळी ही नोट छापून चलनात आली त्यावेळी मात्र भारताने त्यावर आक्षेप घेतला कारण या नव्या नोटेवर नेपाळने त्यांचा नवा सुधारित नकाशा छापला असून त्या नकाशात लीपुलेख, लिम्पियाधूरा आणि कालापाणी हे भूभाग नेपाळमध्ये दाखवले आहेत. वास्तविक भारत – नेपाळ सीमेवरील हे भूभाग भारतीय सीमेत आहे मात्र नेपाळ त्यावर दावा करत आहे. खूप वर्षापासून हा वाद चालू असल्याने दोन्ही देशात यावरून अनेकदा तणाव निर्माण झाला. हा वादग्रस्त भाग असल्याने नेपाळने त्यावर दावा करू नये असे भारताचे म्हणणे आहे. तरीही नेपाळ हा विषय ऐन केन प्रकरणाने उकरून काढत आहे. नेपाळ भारताच्या सातत्याने कुरापती काढत आहे कारण त्याला चीनची फुस आहे. मागील काही वर्षापासून नेपाळ हा चीनच्या नादी लागला आहे. चीनने नेपाळला कर्ज देऊन नेपाळला आपल्या अंकित केले आहे. नेपाळचे सध्याचे सरकार हे चीन धार्जिणे आहे. चीन सांगेल तेच ते करत आहे एकाअर्थी नेपाळमधील विद्यमान सरकार हे चीनच्या हातचे बाहुले आहे त्यामुळेच चीन सांगेल त्याप्रमाणे नेपाळचे सरकार वागत आहे. भारतानेही नेपाळला वेळोवेळी त्यांची चूक दाखवून खडसावले आहे आताही भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी भारताची बाजू स्पष्ट करतांना म्हंटले की नेपाळशही आम्ही आमच्या सीमा प्रकरणांवर एका प्रस्थापित मंचाद्वरे चर्चा करीत आहोत. दरम्यान त्यांच्या बाजूने त्यांनी काही एकतर्फी पावले उचलली आहेत, परंतु त्यांच्याकडून काहीही करून आमच्यातील परिस्थिती किंवा वास्तविकता बदलता येणार नाही. १८१६ मधील अँग्लो – नेपाळ युद्धानंतर नेपाळ आणि ब्रिटिश शासित भारत यांच्यात सुगौलीचा करार झाला. हा करार झाल्यापासून भारत आणि नेपाळ यांच्यात सीमावाद सुरू झाला. या करारा नुसार काली नदीला नेपाळची नैसर्गिक पश्रि्चम सीमा म्हणून निश्रि्चत करण्यात आली. काली नदीचा पूर्वेकडच्या भागात लिपुलेख, लिम्पियाधुरा आणि कालापानी हा भाग आहे. १९६० पासून हा भाग भारतीय प्रशासनाच्या नियंत्रणाखाली आहे. २०१९ साली नेपाळने या भूभागावर हक्क सांगितल्यावर भारताने त्यावर हरकत घेतली. त्यानंतर २०२० साली नेपाळने आपल्या नकाशात हा भूभाग दाखवला तेंव्हापासून दोन्ही देशात तणाव निर्माण झाला. भारताकडून हा तणाव कमी करण्याचा सातत्याने प्रयत्न होत असताना नेपाळ मात्र चीनच्या नादी लागून सतत भारताच्या कुरापती काढत आहे. आताही चलनी नोटेवर हा भूभाग दाखवून नेपाळने भारताची कुरापत काढून दोन्ही देशातील तणाव आणखी वाढवला आहे.

# सिंदखेड राजा येथे मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे दुसरे प्रशिक्षणाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ
■ देवानंद सानप





**सिंदखेडराजा :** मा. भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला असून दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. सदर निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक ८ नोव्हेंबर २०२४ व ९ नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे दुसरे प्रशिक्षण सहकार विद्या मंदिर सिंदखेड राजा येथे मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे.

मा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रा.खडसे यांच्या आणि सौ. निता संजय खडसे यांच्या आवाजामध्ये स्वरबद्ध केलेले निवडणुकीच्या गीताने आजच्या प्रशिक्षण वर्गाची सुरुवात करण्यात आली. आनंद मय वातावरणात आजचे पहिल्या दिवसाचे प्रशिक्षण पार पडले.

प्रशिक्षण दरम्यान भारत निवडणूक आयोग यांची कायदे,तरतुदी आणि अद्ययावत सूचना यांची माहिती सांगण्यात आली. ईव्हीएम, व्हीव्हीपॅट कार्यप्रणाली यांच्या बद्दल सविस्तर माहिती सांगण्यात आली, टपाली मतपत्रिका व निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र अर्ज व नमुने यांचा अहवाल भरणे बाबत माहिती सांगण्यात आली. मतदान संकलन केंद्रावर ईव्हीएम तसेच मतदान साहित्य ताब्यात घेणे,सूचीनुसार साहित्य तपासणी करणे, ईव्हीएम तपासणी करणे, टपाली मतपत्रिका घेतली असेल तर स्वतःचे मतदान करून घेणे याबद्दलची सविस्तर माहिती देण्यात आली. मतदानापूर्वी कोणकोणत्या गोष्टीची काळजी घेतली पाहिजे याबद्दल प्रा.खडसे यांनी सांगितले कि, मतदान केंद्र उभारणी करणे,अभीरूप (मॉकपोल) मतदान घेणे, कंट्रोल युनिट मधून अभिरुप मतदान नष्ट करणे, VVPAT मधील अभिरूप मतदान चिट्ठ्या करणे सील करणे याबद्दलची दक्षता घेतली पाहिजे यावर खडसे यांनी भर दिला. प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष मतदान सुरू करण्यापूर्वीची कामे कशाप्रकारे पार पडली पाहिजे आणि त्याची दक्षता कशी घेतली पाहिजे याबद्दल प्रा. खडसे यांनी काही महत्त्वाच्या गोष्टीं सांगितल्या, प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात करताना मतदान अधिकारी यांनी त्यांची कामे कशाप्रकारे पार पडली पाहिजेत तसेच मतदान केंद्राध्यक्ष यांनी महत्त्वाच्या प्रसंगी करावयाचे कार्यवाही याबद्दल त्यांना माहिती सांगण्यात आली.

EVM मशीनच्या वापराबद्दल आणि त्याच्या हाताळणी बद्दल ईव्हीएम प्रशिक्षण कक्षाचे नोडल अधिकारी उद्धव मांटे आणि सहाय्यक नोडल अधिकारी शिवानंद वाकदकर, सुशील शिलवंत यांनी सर्व मतदान अधिकारी व मतदान केंद्राध्यक्ष यांना खूप चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले. मतदानादरम्यान मतांच्या गोपनियते बाबत माहिती देणे,मतदान सुरू केल्याची घोषणा करणे, मतदान केंद्राध्यक्ष यांनी दैनंदिनी मध्ये घटनांची नोंद घेणे, निवडणूक निर्णय अधिकारी यांना मतदान स्थिती आकडेवारी कळविणे इत्यादी गोष्टी मतदानादरम्यान करायला पाहिजे याबद्दल सरांनी मुद्देसूद माहिती दिली. सर्व मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांना मास्टर ट्रेनर द्वारे प्रत्यक्षपने प्रात्यक्षिक करून ईव्हीएम मशीन कसे हाताळायाचे याचे प्रशिक्षण देण्यात आले, त्या प्रात्यक्षिक कक्षाची पाहणी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश माहोर यांनी केली, सोबत नायब तहसीलदार सायली जाधव, सहायक नोडल अधिकारी प्रसारमाध्यम प्रकाश शिंदे, मतदान अधिकारी श्रीकांत बुलबुले, पी. जे. दंदाळे उपस्थित होते.

या दोन दिवसाच्या प्रशिक्षणा दरम्यान आज पहिल्या दिवशी मतदान अधिकारी, झोनल अधिकारी,मास्टर ट्रेनर यांना प्रशिक्षण देण्यात आले, सोबत निवडणूक साहित्य स्वीकृती व तपासणी बाबत मार्गदर्शन सूचना करण्यात आले, मतदानाच्या एक दिवस अगोदरची मतदान केंद्रावरील पूर्वतयारी कशाप्रकारे असायला हवी याबद्दल काही सूचना प्रा. खडसे यांनी दिल्या आहेत. आजचे प्रशिक्षण खूप आनंददायी वातावरणात पार पडले,जवळपास एकूण ८०० अधिकारी कर्मचारी यांना आज प्रशिक्षण देण्यात आले. दुपारी प्रशिक्षणामधील सर्व प्रशिक्षणार्थींना जेवणाची उत्तम सोय करण्यात आली होती.

या दोन दिवसाच्या प्रशिक्षणासाठी तहसीलदार सिंदखेड राजा अजित दिवटे, तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, गट विकास अधिकारी सिंदखेड राजा मुकेश माहोर,निवडणूक नायब तहसीलदार सिंदखेड राजा मनोज सातव, निवडणूक नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रवीण घोटकर,नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव, नोडल अधिकारी श्री गावंडे, प्रसार व प्रचार माध्यम नोडल अधिकारी अंकुश म्हस्के, संजय सोनुने तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.

## ऍरोबिक व्यायाम सर्वात उपयुक्त

वजन कमी करण्यासाठी आणि शरीरातल्या ङ्गॅटस्चे ज्वलन करण्यासाठी नेमका कोणता व्यायाम करावा याबाबत नेहमीच चर्चा चालते आणि चर्चेत सहभागी होणारे लोक आपापल्या परिने आपली मते व्यक्त करीत असतात. परंतु अमेरिकेतील नॉर्थ कॅरोलीना येथील काही संशोधकांनी वजन कमी करण्यासाठी ऍरोबिक व्यायाम सर्वाधिक उत्तम असल्याचे दाखवून दिले आहे. त्यांनी या बाबत प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे काही निष्कर्ष काढले आहेत त्यासाठी बैठी कामे करणार्‍?या २३४ स्त्री–पुरुषांच्या शरीरातील बदल न्याहाळले आहेत.

१८ ते ७० वर्ष या वयोगटातील या लोकांची नोंद घेतली आणि त्यांना ८ महिन्याचा ऍरोबिक अभ्यासक्रम पूर्ण करावयास लावले. त्यामध्ये ऍरोबिक ट्रेनिंग, रेझिस्टन्स ट्रेनिंग या दोन प्रकारच्या व्यायामांचा समावेश होता. या दोन्ही व्यायामांचे वेगवेगळे परिणाम नोंदण्यात आले तेव्हा असे आढळले. ऍरोबिक व्यायाम करणार्‍?यांच्या हृदयाचे ठोके चांगले पडतात. हा व्यायाम आठवड्यातून तीन दिवस प्रत्येक दिवशी ४५ मिनिटे केला तरी चालते. त्यामुळे वजन कमी होते. अशाच प्रकारच्या अन्य व्यायाम प्रकारांनी स्नायूंना चांगला व्यायाम होतो, भूक चांगली लागते. परंतु वजन उतरण्याच्याबाबतीत त्यांचा ङ्गारसा उपयोग होत नाही. यातल्या २३४ लोकांच्या तीन महिन्यांच्या अभ्यासक्रमा नंतरच्या वजनांची तुलना करण्यात आली. तेव्हा ऍरोबिक व्यायाम करणाऱ्यांनी बरेच वजन गमावल्याचे आढळले.

# मतदार आणि उमेदवारांकरिता विविध ॲप्लिकेशन्स...

## ‘सी –व्हिजिल ॲप’ आता मराठीमध्ये देखील उपलब्ध




भारत निवडणूक आयोगाने मतदार आणि उमेदवारांकरिता सी–व्हिजिल, सुविधा ॲप, फिडेविट पोर्टल, व्होटर टर्नआऊट ॲप, व्होटर हेल्पलाइन ॲप, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांकरिता सक्षम ॲप, केवायसी ॲप आणि १९५० क्रमांकाची हेल्पलाईन आदी आयटी प्लिकेशन्सच्या माध्यमातून सुविधा दिल्या आहेत, त्यांची थोडक्यात माहिती...

**सी–व्हिजिल**

सी–व्हिजिल हे ॲप हे आदर्श आचारसंहिता आणि खर्चाच्या उल्लंघनाची तक्रार करण्याकरिता एक अभिनव असे मोबाइल ॲप्लिकेशन आहे. ज्याद्वारे प्रत्येक नागरिकाला निवडणुकीच्या वेळी आपल्या स्मार्टफोनचा उपयोग करून छायाचित्रे, श्राव्य, किंवा दृक चित्रण अपलोड करता येते. ‘सी–व्हिजिल’ चा अर्थ ‘सतर्क नागरिक’ असा आहे. हे ॲप आता मराठी भाषेत पण उपलब्ध आहे.या पच्या माध्यमातून तक्रार दाखल झाल्यानंतर आचारसंहिता उल्लंघन झाल्याचे ठिकाण शोधण्यासाठी जी.पी. एस.चा उपयोग करता येतो.तक्रारीच्या स्थितीचा मागोवा घेवून १०० मिनिटांत स्थितीची माहिती देते.

सी–व्हिजिल ॲप डाउनलोड करण्यासाठी लिंक. गुगल प्लेस्टोअरमध्ये https://play.google.com/store/apps/details?id=in.nic.eci.cvigilhl=enšIN nb ñQ>moAa https://apps.apple.com/in/app/cvigil/id1455719541 वर उपलब्ध आहे.

सुविधा प २.०

भारत निवडणूक आयोगाने) ’सुविधा २.०’ हे मोबाईल ॲप अद्ययावत केले असून याद्वारे उमेदवार आणि पक्षांना आता कोणत्याही ठिकाणाहून सहजपणे निवडणूक मोहिमेच्या परवानग्या ऑनलाईन सुविधेद्वारे मिळणार आहे. सुविधा २.० हे मोबाईल ॲप वापरण्यास सहज आणि अधिक सुरक्षित आहे. या ॲपच्या खास वैशिष्ट्यांमध्ये उमेदवारांना अर्ज डाउनलोड करणे, प्रचारासंदर्भातील परवानग्या मागवणे, अर्ज केलेल्या परवानगी संदर्भात सद्यस्थिती जाणून घेणे आणि मंजुरीची प्रत डाउनलोड करणे आदी बाबी समाविष्ट आहे. त्याचबरोबर या ॲपमध्ये नामनिर्देशन प्रक्रिया, निवडणूक वेळापत्रक आणि निवडणूक आयोगाच्या ताज्या अद्ययावत सूचना व आदेश देखील उपलब्ध असतील.

गुगल प्ले स्टोअरवर https://play.google.com/store/apps/details?id=suvidha.eci.gov.in.candidateapppli=1 यावर आणि आयओएससाठी ॲपल ॲप स्टोरवर https://apps.apple.com/app/suvidha-candidate/id6449588487 या लिंकवर उपलब्ध आहे.

**फिडेविट पोर्टल**

‘फिडेविट पोर्टल’ निवडणुकीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या नामनिर्देशनाची संपूर्ण यादी पाहता येते. कोणताही नागरिक ‘फिडेविट पोर्टल’चा उपयोग करून उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र पाहू शकतो व डाउनलोड ही करू शकतो. नागरिकांच्या सुविधेसाठी नामांकन दाखल, स्वीकारले, नाकारले, मागे घेतले, उमेदवार स्पर्धेत आहे याची माहिती मिळते.

पोर्टलची लिंक : https://affidavit.eci.gov.in

**व्होटर टर्नआऊट ॲप**

व्होटर टर्नआऊट ॲप प्रत्येक राज्य, जिल्हा आणि मतदारसंघासाठी अंदाजित मतदानाच्या टक्केवारीची दर दोन तासांनी माहिती देते. हे ॲप्लिकेशन फक्त विधानसभा, लोकसभा आणि पोटनिवडणुकीच्या वेळी सक्रिय होते.

‘व्होटर टर्नआऊट’ ॲपमध्ये प्रत्येक राज्य, जिल्हा आणि मतदारसंघाची अंदाजित मतदान टक्केवारी दाखवते.भारत निवडणूक आयोगाच्या सर्व्हर वरून ‘रिअल–टाइम’ डेटाचा उपयोग करण्यात येतो.निवडणूक प्रकार, राज्य, जिल्हा आणि मतदारसंघानुसार यामध्ये मतदानाच्या टक्केवारीची माहिती मिळते.एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील मतदानाचा अंदाज मिळवण्याचा हा एक जलद आणि सोपा असा पर्याय आहे.

‘व्होटर ट्र्नआऊट ॲप डाउनलोड करण्यासाठी गुगल प्लेस्टोअरमध्ये https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.eci.pollturnouthl=enšIN

ॲपल स्टोअर https://apps.apple.com/in/app/voter-turnout-app/id1536366882

**व्होटर हेल्पलाइन ॲप**

मतदारांना आपले मतदार यादीत नाव आहे याची माहिती व्होटर हेल्पलाईन ॲप मध्ये मिळते. हे ॲप प्रत्येकासाठी अधिक सोयीस्कर आणि महत्त्वाचे आहेत. व्होटर हेल्पलाईन पमध्ये मतदारयादीत नावाची शहानिशा करणे,नवीन मतदार नोंदणीसाठी ऑनलाइन अर्ज सादर करणे, दुस–या मतदारसंघात स्थलांतरित करणे,परदेशात राहणारे मतदार, मतदारयादीतील नाव हटवणे किंवा आक्षेप घेणे,नोंदींची दुरुस्त करणे,तुमच्या क्षेत्रातील निवडणुकीचे वेळापत्रक शोधणे, सर्व उमेदवार त्यांचे प्रोफाइल, उत्पन्न विवरण, मालमत्ता, गुन्हेगारी प्रकरणे शोधणे, बीएलओ, ईआरओ, डीईओ आणि सीईओ यांची माहिती मिळवता येते व संपर्क साधता येतो

व्होटर हेल्पलाइन ॲप डाउनलोड करण्यासाठी लिंक :गुगल प्लेस्टोअरमध्ये https://play.google.com/store/apps/details?id=com.eci.citizenhl=mrpli=1

पल स्टोअर https://apps.apple.com/in/app/voter-helpline/id1456535004

**सक्षम ॲप**

भारतीय निवडणूक आयोग दिव्यांग नागरिकांसाठी (पीडब्ल्यूडी) मतदार ओळख आणि नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याकरिता हे ॲप विकसित केले आहे. या ॲपवर दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

निवडणूक संदर्भात सेवा घेण्याकरिता दिव्यांग व वयोवृद्ध मतदारांनी त्यांचे नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक इ. माहिती पमध्ये भरावी. दिव्यांग व वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांना या सक्षम ॲपद्वारे मतदानाच्या दिवशी मतदानासाठी लागणाऱ्या सहाय्यतेची मागणी नोंदविता येईल, त्याद्वारे मतदारसंघातील दिव्यांग आणि वयोवृद्ध मतदारांना त्यांच्या मतदानाचे मतदारसंघ व स्थान निश्रि्चती यंत्रणेला करणे शक्य होईल. या ॲपद्वारे नोंदणी झाल्यानंतर दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रापर्यंत ने–आण करण्यासाठी वाहतूक व्यवस्था, व्हीलचेअर, सहाय्यक, मदतनीस इ. प्रकारची सुविधा या पच्या माध्यमातून मिळणार आहेत.

सक्षम ॲपमध्ये अनेक सुविधा प्रदान करण्यात आल्या आहेत. या ॲपमध्ये मोठे फॉन्ट आणि उच्च कॉन्ट्रास्ट रंग असल्यामुळे दिव्यांगासाठी वापर करणे सोपे होईल. यामध्ये मतदान केंद्राबद्दल माहिती उपलब्ध असून ज्यामध्ये आपले मतदान केंद्राचे स्थान, मतदान केंद्र, उपलब्ध प्रवेश योग्यता आणि अधिकारी संपर्क या तपशिलाचा समावेश आहे. दिव्यांगांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होताना येणाऱ्या कोणत्याही समस्येबद्दल पवर तक्रार नोंदविता येणार आहे.

गुगल प्ले स्टोअर मध्ये https://play.google.com/store/apps/details?id=pwd.eci.com.pwdapp ॲपल फोन धारकांसाठी https://apps.apple.com/in/app/saksham-eci/id1497864568

**केवायसी ॲप**

मतदारांना त्यांच्या उमेदवारांबाबतचा तपशील त्यामध्ये त्यांच्या नावे असलेल्या गुन्ह्यांचा तपशील, उमेदवाराची माहिती इत्यादी पाहता येऊ शकते.

गुगल प्ले स्टोअर मध्ये https://play.google.com/store/apps/details?id=com.eci.ksa

पल फोन धारकांसाठी https://apps.apple.com/in/app/kyc-eci/id1604172836

**१९५० क्रमांकाची हेल्पलाइन**

निवडणूक विषयी मतदारांना सर्व प्रकारची माहिती देण्यासाठी आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी राज्य व जिल्हास्तरावर १९५० या टोलफ्री क्रमांकाची सुविधा सुरू करण्यात आलेली आहे.राज्यस्तरावर तसेच जिल्हास्तरावर संपर्क केंद्र स्थापन करण्यात आले आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फ़क्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# गद्दारांना त्यांची जागा दाखवा, उद्धव ठाकरे विरोधकांवर कडाडले

## महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना प्रचंड मताने विजयी करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** गद्दारांना हाताशी धरून मोदी शहा यांनी महाराष्ट्राला लुटण्याचे काम सुरू केले आहे. या गद्दारांना आता त्यांची जागा दाखवा, आणि महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना प्रचंड मताने विजय करा, असे आवाहन उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले. ते मेहकर येथे महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचारासाठी आयोजित भव्य प्रचार सभेत बोलत होते.

यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे पक्षप्रमुख ठाकरे म्हणाले की, मोदी गद्दारांना हाताशी धरून महाराष्ट्र लुटण्याचे काम करीत आहेत.आज माझ्याजवळ काही नसले देवासारखी माणसे माझ्यासोबत आहेत. मोदी शाह व हे मिंदे सरकार मोदीचे नाव व मोदीची गॅरंटी चालत नसल्याने बाळासाहेबाचे नाव घेत आहेत. मात्र त्यांना आपल्या बापाचे नाव घेण्याची लाज वाटते, गद्दारींचे पीक अमाप आले आहे. मोदी बाळासाहेबांमुळे सत्तेत बसले, नसते तुम्हाला भाजपने कचराकुंडी टाकले होते. मात्र ज्यांचे नाव घेऊन तुम्ही मोठे झाले त्यांच्यासोबतच आता गद्दारी सुरू केली आहे.हे संपूर्ण महाराष्ट्राला समजून आले आहे. त्यामुळे आता मोदी शाहाचे नाव चालत नाही हे कळून पडल्यानंतर बाळासाहेबांचे नाव लावून महाराष्ट्रात मोदी फिरत आहेत. मी शेतकरी नसलो तरी मला शेतकऱ्याचे दुःख कळते मी एक माणूस आहे. त्यामुळेच मी महाविकास आघाडीचे सरकार येताच शेतकऱ्यांना २ लाखापर्यंत कर्जमुक्त केले ते माझे कर्तव्य होते आणि तुमच्या प्रेमापोटी मी ते पूर्ण केले. दुर्दैवाने सरकार पडले, नसता संपूर्ण महाराष्ट्रात शेतकऱ्यांना लखपती करण्याचे काम झाले असते, महाविकास आघाडीचे सरकार असताना सोयाबीन ही ६ हजार रुपये क्विंटलच्यावर विकली जात होती. तर कापूस हा १० हजार रुपये क्विंटलच्या वर विकला जात होता. मात्र आता या मिंदे सरकार आल्याने महाराष्ट्रात शेतकऱ्यांचे प्रचंड हाल सुरू आहेत. सोयाबीन केवळ तीन ते चार हजार रुपये क्विंटल विकल्या जात आहे. तर कापूस खरेदी करण्यास टाळाटाळ केला जात आहे. सोयाबीन मध्ये ओलावा कापूस ओला या कारणावरून शेतकऱ्यांचा माल घेण्यास टाळाटाळ केली जात आहे. तर शेतकऱ्यांना प्रत्येक वस्तूवर जीएसटी लावून त्यांची आर्थिक लूट केली जात आहे. जीएसटी जाग्यावर असताना मात्र शेतकऱ्यांच्या शेतमालाचे भावाचे कमी होत आहेत. हे मिंधे सरकार शेतकऱ्यांवर अन्याय करत असून या अन्यायाच्या विरोधात उभे राहून या मिंधे सरकारला घरचा रस्ता दाखवा द्या, असे आवाहनही यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी केले.तर चिखली नगरपालिकेने कचरा खरेदी करण्याचे टेंडर काढले असता ३५ रुपये किलोने कचरा खरेदी करण्याचा भाव काढला आहे. तर सोन्यासारखा माल असताना सोयाबीनला केवळ ३० रुपये भाव मिळत आहे. त्यामुळे या कचरा सरकारला कचरा कुंडीत फेकून द्या, हे मिंधे सरकार गुजरातच्या हितासाठी काम करत आहे. तर मी महाराष्ट्राच्या हितासाठी तुमच्या बळाच्या जोरावर लढत आहोत. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर काही काळातच कोरोना सारख्या प्रचंड माहामारीने हतबल केले असताना महाराष्ट्र मात्र तुमच्या बळावर रोजगार निर्माण करण्याचे, विकासाचे करार करत होता. साडेसहा हजार कोटी रुपयाचे करार त्यावेळेस करण्यात आले होते. टाटा एअरबस ची कंपनी विदर्भात सुरू करण्याची बोलणी सुरू होती. परंतु दुर्दैवाने आपले सरकार केल्याने ही कंपनी विदर्भात उभी राहू शकली नाही, मात्र फडणवीस यांनी ही कंपनी गुजरातला नेण्यासाठी मदत केली. शेतकऱ्यांच्या हिताच्या गप्पा मारायच्या आणि शेतकऱ्यांना काहीच द्यायचे नाही असे हे गद्दार असून शेतकऱ्यांचा शेतमालाला भाव न देणाऱ्या या सरकारला सुद्धा आता भाव देऊ नका ही वेळ तुमच्याजवळ आहे. बुलढाण्यात एका गद्दाराचा निसटता पराभव झाला असला तरी आता मात्र या गद्दारांची शेपटी ही बाहेर निघू देऊ नका, असे आवाहन यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसैनिक व मतदारांना केले. तर या गद्दाराला मी उमेदवारी देऊन चूक झाली होती. मात्र आता ती चूक दुरुस्त करण्याची वेळ आली आहे. शिवसेनेचा शेंदूर लावून या गद्दाराला देव केले होते.पण तो धोंडा निघाला. त्यांना आता त्याची जागा दाखवा, माझ्यासोबत तुमच्यासारखे सोन्यासारखी माणसं असून जीवाला जीव देणारे आहेत. तुमच्या समस्या निकाली लावण्यासाठी सिद्धार्थ खरात हे योग्य उमेदवार आहेत, म्हणून त्यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे त्यांना प्रचंड मताने विजयी करा, असे आवाहनही यावेळी ठाकरे यांनी केले. तर बाळासाहेबांच्या नावावर समृद्धी महामार्ग उभा केला असला तरी आजूबाजूच्या जमिनी व या महामार्गाचे कंत्राट मात्र त्यांनी जवळच्या लोकांना दिले आणि तब्बल ६० टक्के पर्यंत कमिशन खाल्ले आहे. एकीकडे महाराष्ट्र विकासाच्या बाबतीत अधोगतीकडे जात असताना भ्रष्टाचारात मात्र या मिंधे सरकारने महाराष्ट्राचे पाऊल पुढे टाकले आहे. आता या गद्दारांना जागा दाखवून द्या असे आवाहन उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी केले. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या व महाराष्ट्रातील जनतेच्या हितासाठी महाविकास आघाडीने पंचसूत्री जाहीर केली आहे. या पंचसूत्री कार्यक्रमामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे भले होणार आहे. महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात मी छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर बांधणार असून महाराष्ट्रात मुली प्रमाणेच मुलांना सुद्धा मोफत शिक्षण देऊ, महागाईमुळे हतबल झालेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी जीवन आवश्यक पाच वस्तूंवर दर स्थिर ठेवण्याचे काम करू, याचा परिणाम हा शेतकऱ्यावर कोणत्याही प्रमाणे प्रकारे होणार नाही अशी ग्वाही देत मुंबईही अदानीच्या घशात घालण्याचे काम हे सरकार करत आहे. महाविकास आघाडीचे सरकार येताच मुंबई अडाणी च् घशातून बाहेर काढल्या जाईल व महाराष्ट्रातील जनतेला मुंबईत राहण्यासाठी मापक दरात घरे उपलब्ध करून दिल्या जातील.मुंबईही आपली आहे त्यामुळे मुंबई त येऊन राहा, गुजरातला जाण्यापेक्षा मुंबईत राहा सरकार येताच मी हजारो एकर जमिनीवर सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात घरी उपलब्ध करून देणार आहे. कुटुंबप्रमुख म्हणून मी शेतकरी व नागरिकांची सर्व जबाबदारी घेत आहे आणि ती जबाबदारी नक्कीच यशस्वीपणे पार पाडून सर्वांना न्याय देण्याचे काम सुद्धा करील अशी ग्वाही यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी दिली. तर गद्दारांच्या भूलथापांना बळी न पडता त्यांना आता योग्य जागा दाखवावी हे खोके घेणारे सरकार आहे त्यांचे डोके रिकामे आहेत. तुमच्या हक्कावर दरोडा घालून हे मिंधे सरकार तुमच्या हक्काचा सर्व रोजगार गुजरातला पळवत आहे. त्यामुळे यांना आता घरचा रस्ता दाखवा असे आवाहन यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले.








### गोपाळराव तुम्हालाही न्याय देऊ ठाकरे

मेहकर मतदार संघातील हा शिवसेनेचा मतदार संघ आहे. या मतदारसंघात आमदार केलेला व्यक्ती हा गद्दार निघालेला आहे. अशी टीका नाव न घेता उद्धव ठाकरे यांनी आमदार संजय रायमुलकर यांच्यावर केली तर मतदार संघातील समस्या मार्गी लावण्याचे योग्य उमेदवार म्हणून सिद्धार्थ खरात यांना उमेदवारी दिली आहे. त्यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन केले. शिवसेनेचे गोपाळराव बछिरे हे उमेदवारीसाठी प्रबळ दावेदार होते. परंतु त्यांनी शिवसेनेचे हित लक्षात घेऊन सकारात्मक निर्णय घेतलेला आहे. आखरी ते शिवसैनिक आहेत. गोपाराव तुम्हालाही न्याय देऊ अशी ग्वाही यावेळी उद्धव ठाकरे यांनी गोपाळराव बछिरे यांना दिली.

### कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थिती

मेहकर मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचारासाठी शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आयोजित प्रचार सभेच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे हे होते.तर सुबोध सावजी, काँग्रेसचे राज्य सरचिटणीस श्याम उमाळकर, शिवसेना जिल्हा संघटक गोपाल बछिरे, उपजिल्हा प्रमुख प्रा.आशिष रहाटे,माजी नगराध्यक्ष कासमभाई गवळी, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण घुमरे, माजी सभापती नंदकिशोर बोरे, काँग्रेसचे विधानसभा नेते अँड.अनंतराव वानखेडे, महिला आघाडी उपजिल्हा प्रमुख संजीवनी वाघ, तेजस ठाकरे, पश्रि्चम विदर्भ प्रमुख खा.अरविंद सावंत, आ.मिलिंद नार्वेकर, संपर्क प्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर, जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत, सहसंपर्क प्रमुख छगन मेहेत्रे,महिला आघाडी जिल्हा संघटक विजया पाटील खडसान,महिला आघाडी जिल्हा प्रमुख जिजा राठोड,युवा सेना जिल्हा अधिकारी नंदु कराडे, विधानसभा संघटक किसन पाटील, किसान सेना उपजिल्हा प्रमुख एन.ए.बळी, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, लोणार तालुका प्रमुख अँड.दीपक मापारी,काँग्रेसचे तालुका अध्यक्ष देवानंद पवार, शहर अध्यक्ष पंकज हजारी,माजी सभापती सतिष ताजने,माजी नगरसेवक डी.जी.गायकवाड, शहर प्रमुख किशोर गारोळे, लोणार शहर प्रमुख गजानन जाधव,युवा सेना तालुका अधिकारी आकाश घोडे, शहर अधिकारी ऋषी जगताप, रा.काँ.तालुका अध्यक्ष दत्ता घनवट,माजी नगराध्यक्ष विलास चनखोरे, राजेश अंभोरे, माजी नगरसेवक शैलेश बावस्कर, संदीप गारोळे,अँड.संदीप गवई,स्वप्नील गाभणे,साहेबराव पाटोळे,संजय ठाकरे, विनोद नरवाडे, संजय म्हस्के,माजी जि.प.सदस्य संजय वडतकर सह शिवसेना, काँग्रेस,रा.काँ.चे पदाधिकारी मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन अजीम नवाज राही यांनी केले.

### माजी मंत्री शिंगणे व उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी केले मार्गदर्शन

मेहकर मतदारसंघाच्या प्रचारार्थ शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांची भव्य जाहीर सभा लोणार येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी माजी मंत्री तथा आमदार राजेंद्र शिंगणे व मेहकर लोणार मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी मार्गदर्शन करून महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी करण्याचे आवाहन केले. तसेच यावेळी इतर उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करून महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

### वारकऱ्यांचा फेटा बांधून ठाकरे यांचे स्वागत

लोणार येथे जाहीर सभेसाठी शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे आले असता यावेळी मेहकर मतदारसंघाचे उमेदवार सिद्धार्थ खरात व माजी मंत्री, आमदार राजेंद्र शिंगणे यांनी उद्धव ठाकरे यांचे वारकरी फेटा बांधून स्वागत केले. तसेच यावेळी राजू महाराज तळेकर यांच्यासह उपस्थित वारकऱ्यांनी वारकरी पद्धतीने उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे स्वागत केले. यावेळी धर्मवीर आशिष राहटे यांच्या पुस्तकाचे प्रकाशनही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले .

# 'इंडियन आयडल' फेम प्रसिद्ध मराठी गायकाने मुंबईत खरेदी केलं आलिशान घर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** इंडियन आयडल फेम प्रसिद्ध मराठी गायकाने मुंबईत आलिशान घर विकत घेतलं आहे. रिॲलिटी शोमध्ये दिसलेला गायक राहुल वैद्य याने मुंबईतील वांद्रेमध्ये आलिशान घर विकत घेतलं आहे. स्केयर यार्ड्सच्या रिपोर्टनुसार, राहुल वैद्यने अलिकडे मुंबईतील वांद्रेमधील उच्चभ्रू वस्तीत आलिशान फ्लॅट खरेदी केला आहे. राहुल वैद्यने खरेदी केलेला फ्लॅट डीएलएच सिग्नेचरमध्ये असल्याची माहिती मिळाली आहे.

वांद्रे पश्चिममधील डीएलएच ग्रुपच्या एका प्रिमियम प्रोजेक्टमध्ये राहुल वैद्यने गुंतवणूक केल्याची माहिती आहे. गायक राहुल वैद्य सध्या यशाच्या शिखरावर आहेत. स्क्वेअर यार्ड्सनुसार, राहुल वैद्यने खरेदी केलेलं अपार्टमेंट अंदाजे ३,११० स्क्वेअर फूट (२८८.९२ स्क्वेअर मीटर) कार्पेट एरिया आणि ३१७.९३ स्क्वेअर मीटर (३,४२२ स्क्वेअर फूट) एरियामध्ये पसरलेलं आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये या मालमत्तेचा फायनल व्यवहार पूर्ण झाल्याची माहिती आहे. या आलिशान अपार्टमेंटसाठी राहुल वैद्यने ५६.३७ लाख रुपये मुद्रांक शुल्क आणि ३०,००० रुपये नोंदणी शुल्क दिल्याची माहिती आहे.

इंडियन आयडॉल सीझन १ रनर अप राहुल वैद्य याने अलीकडेच मुंबईत ९ कोटी रुपये किमतीची आलिशान मालमत्ता खरेदी केली आहे.

मालमत्ता सल्लागार कंपनी स्क्वेअर यार्ड्सने बुधवारी एका निवेदनात म्हटलं की, राहुल वैद्यने नुकतेच मुंबईत ९ कोटी रुपयांचे अपार्टमेंट खरेदी केलं आहे. स्क्वेअर यार्डच्या अहवालात ही बाब समोर आली आहे.

डीएलएच सिग्नेचर प्रिमियम प्रोजेक्ट १.२५ एकरमध्ये पसरलेल्या हा पसरलेला आहे. यामध्ये राहुल वैद्यने कोट्यवधीची मालमत्ता खरेदी केली आहे.

### ''संविधानाला रंगामध्ये अडकवण्याचा फडणवीसांचा प्रयत्न'', पृथ्वीराज चव्हाणांचा पलटवार

**सातारा/प्रतिनिधी :** ''संविधान हे पवित्र असून ते आपल्या प्रजासत्ताकाचा पायाभूत कायदा आहे. त्याला रंगामध्ये अडकवण्याचा केविलवाणा प्रयत्न देवेंद्र फडणवीस करत असल्याचा'' जोरदार पलटवार काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे.

# 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' या स्वीप मतदार जागृती उपक्रमांचा शुभारंभ

## जिल्हाधिकारी कार्यालयात थेट प्रक्षेपणाचे आयोजन







दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आज 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' या स्वीप मतदार जागृती उपक्रमांचा राज्यस्तरीय शुभारंभ मुंबईतील गेटवे ाफ इंडिया येथून करण्यात आला. या कार्यक्रमाचे थेटप्रक्षेपण करण्यात आले असून या प्रक्षेपण कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील, निवडणूक निरीक्षक स्मिता सभरवाल, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम. मोहन, अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार आदी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांनी 'मतदान शपथ' घेतली.

२० नोव्हेंबर रोजी आवर्जून मतदान करा– जिल्हाधिकारी

या कार्यक्रमात स्वीप उपक्रमांतर्गत मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या 'लोकशाहीचा उत्सव साजरा करुया, चला मतदानाचा संकल्प करुया' या मतदार जनजागृती ध्वनीचित्रफित संदेशाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच लोकशाहीचा उत्सव असलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मतदान करून आपला अधिकार बजवावा व कर्तव्य पार पाडावे. येत्या २० नोव्हेंबर रोजी आवर्जून मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी केले.

# मुंगळा येथे धाड टाकून गावठी दारू सह अकरा हजाराचे साहित्य जप्त




दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे

**मालेगाव :** मालेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या मुंगळा येथे मालेगाव पोलिसांनी गावठी दारू हातभट्टीवर छापा टाकून दहा लिटर गावठी दारू व २२५ लिटर दारू सडवा असे एकूण ११, हजार १२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्याची कारवाई दिनांक ७ सप्टेंबर रोजी दुपारी मुंगळा शेत शिवारात केली मारुती देविदास मुकिंदा सरकटे मुंगळा याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत प्राप्त माहितीनुसार मुंगळा येथील देविदास सरकटे हा गावठी दारू विक्री करीत असून दारू काढण्याचा धंदा करीत असल्याची गुप्त माहिती मालेगाव पोलीस स्टेशनच्या ठाणेदार संजय चौधरी यांना मिळाली यावरून ठाणेदार चौधरी यांनी मालेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दिलीप रहाटे पोहे का गजानन पांचाळ गजानन शिंदे रवी खडसे यांनी मुंगळा येथे देविदास सरकटे येथे धाड टाकले असता दहा लिटर गावठी दारू व गावठी दारू बनविण्याचा सडवा असा एकूण ११११२५ रुपयाचे मुद्देमाल जप्त केला

## विविध वृत्त...

### निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर डोणगांव येथे पोलीसांचा रुट मार्च; अधिकारी कर्मचाऱ्यासह सीआरपीएफ कर्मचाऱ्यांचा सहभाग



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी डोणगांव पोलीस स्टेशनच्या वतीने दि.८ नोव्हेंबर रोजी डोणगाव येथे रूट मार्च काढण्यात आला. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर पोलीस प्रशासन अलर्ट झाले असून गैर कृत्य करणाऱ्यांवर पोलीस बारकाईने नजर ठेवून आहेत. त्याचबरोबर अवैध धंद्यांना सुद्धा लगाम लावण्यात आला असून कारवाईचा सपाटा सुरू केला आहे. त्याचबरोबर आगामी होऊ घातलेले निवडणूक ही शांततेत पार पडावी, निवडणुकीदरम्यान कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, निर्भय मुक्त वातावरणात मतदारांना मतदान करता यावे, यासाठी दि. ८ नोव्हेंबर ला डोणगांव येथे प्रभात फेरी मार्गावर पोलीसांच्या वतीने रूट मार्च काढण्यात आला. यावेळी डोणगांव पोलीस स्टेशन चे ठाणेदार अमरनाथ नागरे व कर्मचारी तसेच सीआरपीएफ चे ३३ कर्मचारी या रूट मार्चमध्ये सहभागी झाले होते. डोणगाव शहरातील प्रभातफेरी मार्गावर रूट मार्च काढण्यात आला.

### बटेंगे तो कटेंगे हा भाजपाचा जुना नारा आहे- सुजात आंबेडकर



दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी** : आज वाशिम जिल्ह्यातील रिसोड येथे प्रचारसभेसाठी आलेल्या वंचितचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि भाजपच्या धोरणांवर टीका केली. त्यांनी सांगितले की, भाजपाची राजकारण नेहमीच दोन धर्मांमध्ये द्वेष निर्माण करण्याचे राहिले आहे. बटेंगे तो कटेंगे हा भाजपाचा जुना नारा आहे आणि जेव्हा योगी आदित्यनाथ स्वतः प्रचारात उतरतात, तेव्हा धर्म आणि कट्टरतावादाच्या राजकारणाला खतपाणी मिळते, असे सुजात म्हणाले. योगी आदित्यनाथ हे एका राज्याचे मुख्यमंत्री आहेत, त्यांनी दुसऱ्या राज्यात येऊन दंगली घडवणारे वक्तव्य देणे टाळावे, असेही ते म्हणाले. भाजपाची नेहमीच दोन धर्मांमध्ये दंगे घडवून आपली सत्ता वाढवण्याची पद्धत राहिली आहे. अशा नेत्यांना थांबवू शकणारी ताकद फक्त वंचित बहुजन आघाडीकडेच आहे. सुजात आंबेडकर यांनी योगी आदित्यनाथांच्या औरंगजेब संदर्भातील वक्तव्यावर उत्तर देताना सांगितले की, जोपर्यंत औरंगाबादचे नाव हायकोर्टाकडून बदलले जात नाही, तोपर्यंत आम्ही त्याला औरंगाबादच म्हणू. संभाजी महाराजांचा कधीही औरंगाबादवर राज नव्हते त्यांचा राज पुण्यात होते. आम्हाला संभाजी महाराजांचा कोणताही विरोध नाही, उलट आम्ही त्यांचा सन्मान करतो. त्यामुळे संभाजी महाराजांचे नाव ठेवायचे असेल तर पुण्याचे नाव संभाजीनगर ठेवा अशी प्रतिक्रिया सुजाता आंबेडकर यांनी दिली आहे.

### ऐश्वर्या-अभिषेकच्या घटस्फोट चर्चादरम्यान निम्रत कौरचं स्टेटमेंट व्हायरल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : गेल्या काही महिन्यांपासून अभिनेता अभिषेक बच्चन आणि अभिनेत्री ऐश्वर्या राय घटस्फोट घेणार असल्याच्या चर्चांना उधाण आलंय. दोघांमध्ये सध्या काही ठीक सुरू नसून लवकरच ते वेगळे होणार असल्याचं म्हटलं जातंय. या घटस्फोटाच्या चर्चादरम्यान निम्रत कौरचंही नाव समोर आलंय. अभिनेत्री निम्रत कौर आणि अभिषेकचं अफेअर सुरू असल्याचंही बोललं जातंय. या सगळ्या गोष्टींमुळे सोशल मीडियावर खळबळ उडाली आहे. यासंदर्भात नवनवीन माहिती समोर येत आहे. अशातच आता निम्रत कौर आराध्याविषयी बोललेलं एक स्टेटमेंट व्हायरल होतंय.

अभिषेक आणि निम्रत कौरच्या लिंकअपच्या बातम्यांनी खळबळ उडालेली असताना आता निम्रतचं आराध्याविषयीचं एक जुनं स्टेटमेंट व्हायरल होत आहे. 'दसवी' सिनेमाच्या प्रमोशनदरम्यान अभिषेक आणि निम्रत सोबत मुलाखती देत होते. यावेळी निम्रतने आराध्याविषयी बोललं होतं. ते सध्या सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे.

# सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात चार मतदान केंद्राची वाढ; आता ३४० मतदान केंद्र

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणूकीत मतदारांना मतदान करणे सोईचे व्हावे, यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदारसंघात मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार २४-सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात चार नवीन मतदार केंद्राची निर्मिती करण्यात आली असून आता सिंदखेड राजा मतदारसंघात ३४० मतदान केंद्र झाले आहेत.

मतदान केंद्राच्या रचनेत सुसूत्रता आणण्यासाठी ज्या मतदान केंद्रांवर मर्यादेपेक्षा जास्त मतदार आहेत किंवा दोन गावातील मतदार एकाच मतदान केंद्रांना जोडण्यात आलेले होते, असे सर्व मतदान केंद्र मिळून जिल्ह्यात नव्याने २३ मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. सिंदखेड राजा मतदार संघात चार नवीन मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये सिंदखेड राजा शहरातील नगर परिषद प्राथमिक उर्दु शाळा, पंचायत समिती आवक जावक विभाग, जांभोरा व पांगरी उगले येथे मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात ३४० मतदान केंद्र झाले असून शहरी भागात ३९ तर ग्रामिण भागात ३०१ मतदान केंद्र आहेत. नवीन मतदान केंद्राच्या निर्मितीमुळे कुटुंबातील सर्व मतदारांची नावे एकाच मतदान केंद्रावर उपलब्ध होणार आहेत.

लोकसभेला जिल्ह्यात २ हजार २६५ मतदान केंद्रे होती. यात २३ नवीन मतदान केंद्रांची वाढ होऊन २ हजार २८८ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. दि. १ जुलै २०२४ अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्र सुसूत्रीकरणांतर्गत मतदान केंद्रात वाढ करण्यात आली आहे.

**मतदारसंघात चार नवीन मतदार केंद्राची वाढ**

१. मतदान केंद्र क्रमांक १५८-अंभोरामध्ये जांभोरा या गावच्या मतदारांचा समावेश आहे. अंभोरा व जांभोरा या दोन गावांचे आमना नदीमुळे विभाजन झालेले आहे. त्यामुळे जांभोरा गावच्या लोकांना मतदान केंद्रावर येण्यास ८ ते १० की.मी. अंतरावरून वळसा घालून यावे लागत असल्याने १५९-जांभोरा येथे नविन मतदान केंद्र सुरु करण्यात आले आहे.

२. सिंदखेड राजा तालुक्यातील मतदान केंद्र क्रमाक २२८ व २३३ हे एकाच ठिकाणी असुन त्या दोन्ही मतदान केंद्रावरील मतदार संख्या १४०० पेक्षा जास्त झाल्यामुळे मतदान केंद्र क्रमांक २२८ मधील ३६० व केंद्र क्रमांक २३३ मधील ४९४ मतदार असे एकुण ८५४ चे नविन मतदान केंद्र २३० - सिंदखेड राजा नगर परिषद प्राथमिक उर्दु शाळा जुनी इमारत सिंदखेड राजा येथे सुरुवात करण्यात आले आहे.

३. सिंदखेड राजा तालुक्यातील मतदान केंद्र क्र.२३५ व २३६ हे एकाच ठिकाणी असुन त्या दोन्ही मतदान केद्रावरील मतदार संख्या १४०० पेक्षा जास्त झाल्यामुळे मतदान केंद्र क्रमांक २३५ मधील ४२२ व केंद्र क्रमांक २३६ मधील ६०५ मतदार असे एकुण १०२७ चे नविन मतदान केंद्र २३९ - सिंदखेड राजा पंचायत समिती आवक जावक विभाग येथे सुरु करण्यात आले आहे.

४. पांगरी उगले येथे मतदारांची संख्या मर्यादेपेक्षा जास्त असल्यामुळे मतदान केंद्र क्रमांक २७४-पांगरी उगले जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा रुम नं २ येथे नवीन मतदान केंद्र तयार करण्यात आले.

**३ लक्ष २२ हजार मतदार बजावणार मतदानाचा हक्क**

२४- सिंदखेड रजा मतदारसंघात ३ लक्ष २२ हजार ९९५ मतदार असून त्यामध्ये १ लक्ष ६८ हजार ६०१ पुरुष तर १ लक्ष ५४ हजार ३९३ महिला व १ तृतीयपंथी मतदार आहेत. ८५पेक्षा जास्त वयोमान असलेले मतदार ६ हजार १३८ असून २ हजार ४१२ पुरुष तर ३ हजार ७२६ महिला मतदार आहेत. तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये प्रथमच मतदानाचा हक्क बजावणारे ६ हजार २१६ नवमतदार असून ४ हजार २ पुरुष तर २ हजार १२४ महिला नवमतदार आहेत.

### मतदान यादीत नाव असल्याची मतदारांनी खात्री करावी- जिल्हाधिकारी डॉ. पाटील



भारत निवडणूक आयोगाने घोषीत केलेल्या कार्यक्रमानुसार दि. २० नोव्हेबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सर्व मतदारांनी मतदानाच्या दिवशी मतदान करावे. यासाठी मतदारांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करुन घ्यावी. मतदार केंद्र जाणून घेण्यासाठी व्होटर हेल्पलाईन ॲप किंवा voters.eci.gov.in या संकेतस्थळाचा वापर करावा. तसेच मतदार नोंदणी किंवा मतदान केंद्राची माहिती शोधण्याच्या बाबतीत काही मदत हवी असल्यास १९५० या टोल फ्री क्रमांक किंवा सिंदखेड राजा मतदारसंघासाठी हेल्प लाईन क्रमांक १८००२३३६३६८ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

### मुंबईकरांसाठी महत्त्वाची बातमी, वांद्रे-खार पादचारी पूल तोडणार, हार्बरचे वेळापत्रक विस्कळीत होणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईत पश्चिम रेल्वेच्या पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेचे काम प्रगतीपथावर आहे. खार आणि मुंबई सेंट्रल स्थानकांदरम्यान असमाऱ्या मार्गिकेचा विस्तार करण्यात येणार आहे. यासाठी वांद्रे टर्मिनस आणि खार उपनगरीय स्टेशनला जोडणारा पूल आता तोडण्यात येणार आहे. आता या ठिकाणी नवा पूल उभारण्यात येईल. मात्र, या कामामुळे पश्चिम रेल्वेवरील हार्बरचे वेळापत्रक जवळपास ६ महिने विस्कळीत राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबईकरांना वाहतुकीच्या समस्येचा सामना करावा लागू शकतो. सध्या ९१८ कोटी रुपयांच्या या मार्गिका विस्तारमुळे मेल एक्स्प्रेस गाड्यांसाठी आता स्वतंत्र मार्ग उपलब्ध होणार आहे. या कामात वांद्रे ते खार पादचारी पूल अडथळा ठरत होता. त्यामुळे तो तोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा पूल सुमारे ३१४ मीटर लांबीचा असून त्याची रचना जुन्या स्वरुपाची आहे. याठिकाणी आता नव्या पुलाची उभारणी करण्यात येईल. या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते गोरेगाव अशी अखंड मार्गिका सुरू न राहता ती गोरेगाव ते खार आणि सीएसएमटी ते वांद्रे अशी सुरू राहील.

### महायुतीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण? शाहांचे सूचक विधान

**सांगली/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात प्रचार शिगेला पोहोचला आहे. कोणत्याही परिस्थितीत ही निवडणूक जिंकायचीच असा निश्चर्य महाविकास आघाडी आणि महायुतीने केला आहे. ही निवडणूक जिंकण्यासाठी महायुतीने तर थेट दिल्लीतील नेत्यांना महाराष्ट्रात प्रचारासाठी पाचारण केले आहे. आज (८ नोव्हेंबर) महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा झाली. तर दुसरीकडे सांगली जिल्ह्यातील शिराळा येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यांची जाहीर सभा झाली. दरम्यान, शाह यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या विधानाची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा होत आहे.

आपल्या सभेत अमित शाह यांनी महाविकास आघाडीवर सडकून टीका केली. तसेच राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार यावे यासाठी मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले. त्यांनी आपल्या भाषणात बोलताना देवेंद्र फडणवीस यांच्यावरही भाष्य केलं. २० नोव्हेंब रोजी महाराष्ट्रात मतदान होणार आहे. त्यामुळे या दिवशी आपल्या सगळ्यांना निर्णायक भूमिका घ्यायची आहे. मी दोन महिन्यांपूर्वी संपूर्ण महाराष्ट्रात दौरा केला आहे. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांना आणायचं आहे, अशी इच्छा महाराष्ट्रातील जनतेची आहे, असे अमित शाह म्हणाले.

अमित शाह यांनी यावेळी जनतेला अनेक आश्वासनं दिली. शिराळ्याच्या भुईकोट किल्ल्यावर छत्रपती संभाजी महाराज यांचे मोठे स्मारक बनवू. शरद पवार यांच्याकडे १० वर्षे सत्ता होती. त्यांनी महाराष्ट्राला काय दिले हे सांगावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मात्र देशाची तिजोरी महाराष्ट्रासाठी खोलली, असा दावा अमित शाह यांनी केला.

या विधानसभा निवडणुकीत शिवसेना (एकनाथ शिंदे गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि भाजपा महायुतीच्या रुपात एकत्र निवडणूक लढवत आहेत. सत्ता आल्यास राज्याचा मुख्यमंत्री कोण होणार? याबाबतचे महायुतीचे धोरण अद्याप समोर आलेले नाही. मात्र सध्याच्या विधानसभेत भाजपाचे सर्वाधिक मुख्यमंत्री असूनही देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्रिपदावर आहेत. सर्वाधिक आमदार

## देवेंद्र फडणवीसांकडून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सुखावणारा मोठा शब्द

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींची महाराष्ट्रात पहिली सभा धुळ्यामध्ये पार पडली. ''महाराष्ट्राच्या निवडणुकीत नरेंद्र मोदींच्या प्रचाराची सुरुवात खान्देशातील धुळ्यातून झाली, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. प्रचारसभेची सुरुवात धुळ्यातून यासाठी केली, कारण गेल्या १० वर्षात मोदींच्या नेतृत्वात जे काम झालं, त्यामुळे पुढ्च्या ५ वर्षात धुळे जिल्हा महाराष्ट्रातील नंबर १ जिल्हा होणार आहे. आज आपण पाहतोय, ज्या प्रकारे सुलवाडे-जामफळच्या माध्यमातून या जिल्ह्याच्या प्रत्येक शेतीला पाणी जातय. शेतकऱ्याच्या बांधापर्यंत पाणी पोहोचलय. अक्कलपाडा धरणाची उंची वाढवून त्याठिकाणी धुळे शहराला पिण्याच्या पाण्याची कधीच टंचाई भासणार नाही अशी काम होत आहेत'' असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

धुळ्याच्या प्रचारसभेत ते बोलत होते.

''मोदींच्या नेतृत्वाखाली मनमाड-इंदूर रेल्वेसेवेच्या माध्यमातून एक अशा प्रकारच सेंटर धुळ्यामधे तयात होतेय. मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडोर, धुळे-मनमाड रेल्वे या सगळ्याचा एकत्रित विचार केला, तर इंडस्ट्रीज लॉजिस्टिक सेंटर कुठलं असेल, तर धुळे जिल्हा असेल. मोदींनी ६ राष्ट्रीय महामार्ग धुळ्याला दिले'' असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. ''धुळे जिल्हा १०० टक्के रिझल्ट देणार. महायुतीच्या ५ही जागा निवडून येणार. सरकार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली लाडक्या बहिणींना मदत करतय. मुलींना मोफत शिक्षण, मोदींच्या नेतृत्वाखाली लखपती दीदी या योजना सुरु आहेत. शेतकऱ्यांसाठी १ रुपयात ८ हजार रुपये पीक विम्याची योजना सुरु आहे. सरकारने शेतकऱ्यांना वीज बिल माफ करुन शेतकऱ्यांची वीज बिलातून मुक्ती केली. पुढच्या ५ वर्षांसाठी वीज बिलातून मुक्ती सरकारने दिलीय'' असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

''महाराष्ट्रात तुमच्या आशिर्वादाने सरकार आलं की, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्याशिवाय एमएसपी पेक्षा भाव कमी झाल्यास भावांतर योजना राबवून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा होतील'' असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

''एकीकडे आम्ही विकास करतोय. सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन महाराष्ट्र पुढे नेतोय. दुसरीकडे आमच्या विकासाला उत्तर देता येत नाही, म्हणून आमच्या विरोधकांनी रणनिती आखली आहे. धुळ्यात ते वोट जिहाद करतायत. आम्ही लोकसभेला धुळ्यात १ लाख ९० हजार मतांनी पाचही मतदारसंघात पुढे होतो. मात्र वोट जिहादमुळे मालेगाव सेंट्रल आणि धुळ्यातील ४ हजार मतांनी पराभव झाला. आता जागे झालो नाही, तर नेहमीसाठी झोपावं लागेल. ही निवडणूक जागं होण्याची आहे'' असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलंय.

## तुर, कापूस पिकांवरील किड रोग नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी एकात्मिक उपाययोजना राबवावी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : तूर पिकातील शेंगा पोखरणाऱ्या अळीला पोषक हवामान व वातावरणामुळे तुर पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच कापूस पिकांवर दहिया रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. यासाठी शेतकरी बंधूंनी आपल्या पिकांची पाहणी करून वेळीच व्यवस्थापनाचे उपाययोजना करावे, असे आवाहन बुलढाणा कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अमोल झापे व विषय विशेषज्ञ प्रा. प्रवीण देशपांडे यांनी केले आहे.

तुर पिकांचे नुकसान करणारे अळयांचे प्रकार

शेंगा पोखरणारी अळी: या किडीची मादी पतंग तुरीच्या कळ्या फुले व शेंगा यावर अंडी घालते. अंड्यातून निघालेल्या अळ्या तुरीच्या कळ्या आणि फुले खाऊन नुकसान करतात. पूर्ण वाढ झालेली अळी ३०-४० मिमी. लांब, विविध रंग छटात दिसून येते जसे की पोपटी, फिक्कट गुलाबी व करड्या रंगाची असून तिच्या पाठीवर तुटक करड्या रेषा असतात मोठ्या अळ्या शेंगांना छिद्र करून आतील दाणे उकरून खातात.

शेंगमाशी: या माशीची अळी बारीक गुळगुळीत व पांढऱ्या रंगाची असून तिला पाय नसतात. तोंडाकडील भाग निमुळता व टोकदार असतो ही अळी शेंगाच्या आत राहून शेंगातील दाणे अर्धवट कुरतडून खाते व त्यामुळे दाण्याची मुकनी होते.

पिसारी पतंग: या पतंगाची





अळी १२.५ मिमी. लांब हिरवट तपकिरी रंगाची असते तिच्या अंगावर सूक्ष्म काटे व केस असतात आणि शेंगेवरील साल खरडून छिद्र करते व बाहेर राहून दाणे पोखरते

तूर पिकाकरीता उपाययोजना : या तिन्ही अळ्या कळ्या फुले व शेंगावर आक्रमण करीत असल्यामुळे त्यांच्या एकात्मिक व्यवस्थापन जवळजवळ सारखेच उपाययोजावे लागतात. यासाठी प्रति हेक्टर २० पक्षी थांबे शेतात उभारावे त्यामुळे पक्षी किडींच्या अळ्या खाऊन फस्त करतात. तसेच पिकांवर योग्य फवारणी करावी.

पहिली फवारणी : पिक ५० टक्के फुलोरावर असताना निंबोळी अर्क ५ टक्के किंवा अझाडेरेक्टीन ३०० पी.पी.एम. ५० मिली. किंवा अझाडेरेक्टींन १५०० पी.पी.एम, २५ मिली. किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी २० मिली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी

दुसरी फवारणी: पहिल्या फवारणी नंतर १५ दिवसांनी इमामेक्टीन बेंझोएट ५ एस. जी. ३ ग्रॅम किंवा क्लोरॅनट्रानीप्रोल ५ टक्के एस.सी. २.५ मिली. पैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी अळ्यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर असल्यास तुरीच्या झाडाखाली पोते टाकून झाड हलवावे त्यामुळे झाडावरील अळ्या पोत्यावर पडतील व त्या गोळ्या करून नष्ट कराव्यात

कापूस पिकाकरीता उपाययोजना : दहिया प्रादुर्भावग्रस्त पिकाचे अवशेष जाळून नष्ट करावेत. नत्रयुक्त खतांचा अतिवापर टाळावा तसेच पिकावर रोगाचा प्रादुर्भाव दिसत असतांना फवारणीद्वारे नत्र खते देऊ नये. रोगाचा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास अझोक्सीस्ट्रोबिन१८.२ % + डायफेनोकोनाझोल ११.४ % एस. सी. १ ग्रॅम किंवा क्रेसोझीम मिथाइल ४४.३ % एस. सी. १ ग्रॅम किंवा कार्बेन्डॅझिम१२ % + मन्कॉझेब मॅन्कोझेब ६३ % डब्लू. पी. ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात घेऊन फवारणी करावी.